# १. इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना

सदरची योजना केंद्र शासन पुरस्कृत योजना असुन दिनांक १५ ऑगस्ट १९९५ पासून संपुर्ण महाराष्ट्रात कार्यान्वीत झालेली आहे. या योजनेमध्ये जे पात्र लाभार्थी संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाच्या यादीत नाव असलेल्या वय वर्ष ४० ते ६५ पेक्षा कमी वयोगटातील लाभार्थी या योजनेस पात्र राहतील.

# इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना

- केंद्र शासनाने विहीत केलेल्या निकषानुसार राज्यातील दारिद्रय रेषेखालील नोंद असलेली ४० ते ६५ वर्षाखालील विधवा स्त्रियांना इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेमध्ये केंद्र शासनाकडुन रुपये २००/- दरमहा दिले जातात. या योजनेस पुरक असलेल्या राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेमध्ये लाभ्यार्थीना रुपये ४००/- दरमहा दिले जातात. म्हणजेच या दोन्ही योजनेंतर्गत लाभार्थ्यांस एकुण रुपये ६००/- दरमहा निवृत्तीवेतन मिळते.

- पात्रतेचे निकष :-४० ते ६५ वयोगटातील विधवा महिला, कुटुंबाचे नांव ग्रामीण / शहरी भागाच्या दारिद्रय
- रेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये यादीत समाविष्ट असणे आवश्यक व पतीचे निधन
- झाल्याबद्यल संबंधित ग्रामपंचायत / नगरपरिषद / महानगरपालीकेच्या मृत्यू नोंद वहीतील
- उतारा सादर करणे आवश्यक आहे.
- आर्थिक सहाय्य :- या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना
- केंद्र शासनाकडून र. रु. २००/- या प्रमाणे
  राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेमध्ये लाभार्थ्यांना र. ४००/- एकुण र. रु. ६००/- दरमहा निवृत्ती वेतन मिळते
- आवश्यक कागदपत्रे :- १. वयाचा दाखला
- २.उत्पन्न दाखला
- ३.रहिवास दाखला